


दैनिक
# मराठवाडा पत्र
● epaper.marathwadapatra.com
● dailymarathwadapatra2021@gmail.com ■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■ Mo. 9822152955




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ४ थे ●अंक २३४ ●रविवार, दि. ०१ डिसेंबर २०२४ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रुपये

## थोडक्यात

१. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना १०५ओ ताप, कणकण असल्याने दिवसभर दरे गावातील घराबाहेर पडले नाहीत, डॉक्टरांकडून तपासणी, राजभवनाऐवजी अमावस्येला पूजा-अर्चा करण्यासाठी शेतात गेले; पुण्यातून उद्धव ठाकरेंचा टोला, बाबा आढाव यांचं उपोषण सुटलं

२. शरद पवारांचा बाबा आढावांच्या आंदोलनाला पाठिंबा, म्हणाले, 'निवडणुकांमध्ये सत्तेचा गैरवापर आणि पैशांचा महापूर याअगोदर कधीच दिसला नाही', जनतेचा पाच महिन्यांत कौल बदलला, आम्ही काय करणार? अजित पवारांचा बाबा आढाव यांना सवाल, प्रलोभनावरही दिलं उत्तर

३. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या शपथविधीचा मुहूर्त ठरला; तारीख ५ डिसेंबरला दुपारी १ वाजता, आझाद मैदानात सोहळा, सत्ता स्थापनेत गृहखातं सोडाच, पण शिवसेनेतील ४ नेत्यांना मंत्रिमंडळात घेण्यास भाजपचा आक्षेप असल्याची सूत्रांची माहिती, एकनाथ शिंदेंच्या भूमिकेकडे आमदारांचे लक्ष

४. सत्तास्थापनेआधीच नागपुरातही हिवाळी अधिवेशनाच्या तयारीला जोर, आमदारांचा डिजिटल व्यवस्थेत पाहुणचार होणार, १६ ते २४ डिसेंबरदरम्यान होईल नव्या सरकारचं पहिलं अधिवेशन, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी साईदरबारी शपथविधीची तारीख सांगितली, नव्या सरकारचा शपथविधी ५ डिसेंबरला होण्याची शक्यता वर्तवली

५. मुख्यमंत्री आमचाच, पुण्यासह मुंबई, नागपूरातही झळकले बॅनर; महायुतीच्या तिन्ही पक्षातील आमदारांमध्ये चढाओढ, गृहमंत्रीपदी डॅशिंग नेता हवा, अर्थखात्याचा कारभारही सक्षम माणसाच्या हातात हवा; शिंदे गटाच्या संजय शिरसाट यांनी शड्डू ठोकला

६. विधानसभेला मित्रपक्षांनी पाठीत केला वार! स्थानिक स्वराज्य संस्थावेळी मविआ नको, सोलापुरातील ठाकरेंच्या जिल्हाप्रमुखांची भूमिका, EVM मशीनबाबत आरोपांची राळ उठली, माळशिरस तालुक्यातील माकरवाडी गावानं उचललं मोठं पाऊल, ३ डिसेंबरला घेणार बॅलेट पेपरवर मतदान

७. EVM हॅक करता येतं, मी स्वतः इंजिनिअर, मला सगळं माहितीय; महादेव जानकर म्हणाले ईव्हीएमविरुद्ध मोठं आंदोलन उभारणार

८. शिव्या द्याल तर महागात पडेल, ५०० रुपयांचा दंड; नेवासा तालुक्यातील सौंदाळा गावातील ठरावाची राज्यभरात जोरदार चर्चा

९. मध्य प्रदेशात दहशतवाद विरोधी मशाल रॅलीत मोठी दुर्घटना; ३० जण होरपळले, पंधरा गंभीर, १८ आयोजकांवर गुन्हे दाखल, छत्तीसगडमध्ये संतप्त तरुणाची जेसीबी घेऊन आलेल्या तहसीलदारांना मारहाण, व्हिडिओ व्हायरल; गुन्हा दाखल

१०. पहिल्या कसोटीत ऑस्ट्रेलियाचा दारुण पराभव अन् दुसरी सुरु होण्यापूर्वीच बसला तगडा झटका; मिचेल मर्शलाही दुखापत, टीम इंडियाची नवीन एकदिवसीय जर्सी लॉन्च; ७ जानेवारीपासून रोहित सेना नव्या लूकमध्ये दिसणार




# प्रकृती बिघडल्याने एकनाथ शिंदेंनी कार्यकर्त्यांची भेट नाकारली...



**सत्तास्थापनेबाबत मोठ्या घडामोडी घडत असताना राज्याचे काळजीवाहू मुख्यमंत्री मात्र त्यांच्या सातारा येथील दरे या गावात गेले आहेत. त्यांची प्रकृती बिघडली असून त्यांच्यावर डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू असल्याचं वृत्त आहे.**

**बीड । प्रतिनिधी**

राज्यात सत्तास्थापनेचा मार्ग मोकळा झाला आहे. ५ डिसेंबरला मुंबईतील आझाद मैदानात सायंकाळी पाच वाजता शपथविधी सोहळा होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी या सोहळ्यासाठी मुंबईत येणार आहेत. दरम्यान सत्तास्थापनेबाबत एवढ्या मोठ्या घडामोडी घडत असताना राज्याचे काळजीवाहू मुख्यमंत्री मात्र त्यांच्या सातारा येथील दरे या गावात गेले आहेत. त्यांची प्रकृती बिघडली असून त्यांच्यावर डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू असल्याचं वृत्त आहे. दरम्यान, त्यांची चौकशी करण्याकरता गेलेल्या अनेक कार्यकर्त्यांना त्यांची भेट न घेताच माघारी फिरावे लागले आहे.

काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानाबाहेर कडेकोट पोलीस बंदोबस्त करण्यात आला आहे. तसंच, त्यांच्या उपचारांकरता वैद्यकीय पथकही दाखल झालं आहे. दरम्यान, त्यांची भेट घेण्याकरता जवळपासच्या भोर, कराड, सातारा येथून कार्यकर्ते येत असून त्यांची सदिच्छा भेट घेण्याच्या प्रतिक्षेत आहेत. काही कार्यकर्त्यांना ते आज भेटणार होते. भेटण्यासाठी प्रतीक्षाही करायला सांगितली. मात्र, ऐन वेळी त्यांनी भेट नाकारली आहे.

पण निरोप आला की... कराडहून काही महिला कार्यकर्ता आणि पदाधिकारी आज दरे येथे आल्या होत्या. महिला कार्यकर्त्या म्हणाल्या, आम्ही कळवलं होतं की आम्ही लाडक्या बहिणी म्हणून येथे येत आहोत. आम्हाला भेटण्यासाठी थांबण्यासही सांगितलं होतं. पण आता निरोप आला की आजारी असल्याने भेटू शकत नाहीत. दुसऱ्या महिला कार्यकर्त्या म्हणाल्या, एकनाथ शिंदे दरे गावात आलेत हे कळल्याबरोबर आम्ही कराडमधून बोटीने प्रवास करून त्यांना भेटायला आलो. पण डॉक्टरांची टीम आत गेल्याने काही बोलता येत नाही.



*मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते तथा पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांची पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सदिच्छा भेट घेतली. यावेळी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे हे उपस्थित होते.*

# महिला रुग्णाची छेड काढल्याचा आरोपावरून डॉक्टरच्या निषेधार्थ परळी शहर कडकडीत बंद

## पीडितेच्या नातेवाईकासह राजकिय कार्यकर्त्यांचा पोलीस ठाण्यात ठिय्या; डॉक्टराच्या घरासह ठिक ठिकाणी चोख पोलीस बंदोबस्त

**परळी । प्रतिनिधी**

शहरातील एका महिला रुग्णाची डॉक्टरने छेड काढल्याचा आरोप करीत रात्रीच पोलीस ठाणे समोर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या कार्यकर्ते आणि नागरिकांनी ठिय्या मांडून घोषणाबाजी केली. या डॉक्टरच्या निषेधार्थ परळीत कडकडीत बंद पाळण्यात आला. या काळात काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून शहरात ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला. तर आरोप करण्यात येत असलेल्या





डॉक्टरच्या घरालाही मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. परळी येथील एका डॉक्टरकडे एक महिला उपचारासाठी गेली होती. यावेळी संबंधित डॉक्टरने या महिलेची तपासणी करताना विनयभंग केल्याच्या आरोप रुग्ण महिलेने केला. यानंतर महिलेच्या नातेवाईकांसह राजकीय पक्षातील कार्यकर्त्यांनी पोलीस ठाणे समोर गर्दी करीत डॉक्टरच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. यानंतर डॉ. यशवंत देशमुख विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेच्या निषेधार्थ आज परळी शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. याप्रकरणी शहरात काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# वाळू माफियांनी उपजिल्हाधिकाऱ्याच्या वाहनाला धडक देत जीवे मारण्याची धमकी

## माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यामध्ये वाळू उपसा व वाहतुकिवर बंदी असताना देखील दररोज शेकडे वाहनाने महसूलच्या अर्थपूर्ण केल्यानेच राजरोस मुरूम वाहतूक केली जाते.तर बीड शहरातील अनेकांनी वाळूचे साठे केले आहेत.बीड जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी बीड गेवराई महामार्गावर वाळू वाहतूक करणाऱ्या दोन हायवाचा पाठलाग करून ती वाहने



▶▶ उर्वरित पान २ वर

# मोबाईल हिसकावून पळणारी टोळी जेरबंद

## मोबाईल सह दुचाकी जप्त स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील मागील काही दिवसापासून पायी जाणाऱ्या लोकांचे मोबाईल हिसकावून पळून जाण्याचा घटनात वाढ झाली होती. अनेकांचे मोबाईल असेच पसार झालं होते परंतु काही नागरिकांनी तक्रार दिल्या नसल्याने मोबाईल चोरांचे प्रमाण वाढले होते. अंबाजोगाई शहरात मोटार सायकल वर येवुन पाई जात असलेल्या व्यक्तीचे मोबाईल हिसकावुन नेवुन



चोरी करणारी टोळी सक्रिय झाली होती दरम्यान दोन गुन्हयांची नोंद पो.स्टे. अंबाजोगाई शहर ठाण्यामध्ये नोंदविण्यात आली होती. सदर चोरीचे अनुषंगाने मा.पोलीस अधीक्षक बीड यांनी उघडकीस न आलेल्या गुन्हयाचा आढावा घेवुन उघडकीस न आलेले जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड यांना आदेशीत केले होते. त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री. उस्मान शेख यांनी अभिलेखावरील उघडकीस न आलेल्या गुन्हयांचे विश्लेषण करुन स्थागुशा बीड येथील पोउपनि सुतळे यांना याकामी पाचारण केले. पोउपनि सुतळे यांनी दिनांक २८/११/२०२४ रोजी अंबाजोगाई शहर आरोपी शोध

▶▶ उर्वरित पान २ वर

# जागतिक एड्स दिनानिमित्त विविध कार्यक्रम; उद्या प्रभात फेरी

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा रूग्णालयाच्या जिलहा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभागाच्यावतीने जागतिक एड्स दिन व सप्ताहा निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा व अधिक माहितीसाठी




जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात यांनी केले आहे.

दरवर्षी एक डिसेंबर जागतिक एड्स दिन म्हणून साजरा केला जातो. यंदाचे घोषवाक्य (Take The Rights Path) मार्ग हक्काचा, सन्मानाचा ! असे आहे. या दिनाचे औचित्यसाधून सोमवारी (ता.०२ डिसेंबर) सकाळी ०८:३० वाजता श्री. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून प्रभात फेरीचे आयोजन केले आहे. ही प्रभात फेरी दरवर्षीप्रमाणे श्री. छत्रपती शिवाजी महाराज चौक- कारंजा-बलभीम चौक-धोंडीपुरा-माळीवेस-

▶▶ उर्वरित पान २ वर

# बळवंतराव कदम यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन

## बळवंतराव कदम यांचा मराठा आंदोलनात सक्रिय सहभाग

**बीड । प्रतिनिधी**

विविध सामाजिक चळवळ, व विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर आंदोलन करणारे बळवंतराव कदम यांचे आज हृदयविकारचे तीव्र झटक्याने झाले. त्यांच्या मृत्यूची बातमी कळताच हळहळ व्यक्त होत आहे.विद्यार्थी दसेपासून ते गेल्या अनेक वर्षापासून चळवळीमध्ये काम करणारे बीड जिल्ह्याच्या जिव्हाळ्याच्या रेल्वे प्रश्नावर अनेक आंदोलनामध्ये सहभागी असणारे मराठा आरक्षणामध्ये सक्रिय सहभागी असणारे अनेक आंदोलनामधील गुन्हे स्वतःवर दाखल झाले तरी आंदोलनाची नाळ न तुटू दिली नाही. तसेच मांजरसुंबा लगतच्या गावात विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी इंग्लिश स्कूल नसल्याने त्यांनी मांजरसुंबा येथे शिखर इंग्लिश स्कूल या नावाने विद्यार्थ्यासाठी शाळा सुरू केली होती. त्यामुळे शैक्षणिक कार्यात देखील त्याचे मोलाचे योगदान होते. शैक्षणिक चळवळीतील घाटावरील सहकारी बळवंतराव कदम यांचे हृदयविकाराने निधन झाल्याने मित्रपरिवार हळहळ व्यक्त करत आहेत.

# धनंजय मुंडेंनी विधानसभा निवडणुकीत दगा दिला;

## आष्टीचे मावळते आमदार आजबेंचा गौप्यस्फोट

**आष्टी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका नुकत्याचं पार पडल्या. सध्या सत्ता स्थापनेच्या हालचाली सुरू आहेत. २३ नोव्हेंबर रोजी निकाल लागला असला तरी अद्याप मुख्यमंत्रीपदाबद्दल अधिकृत अशी घोषणा महायुतीकडून झालेली नाही. त्यामुळे मुख्यमंत्री पदासह बाकी अनेक घडामोडींबद्दल उलट-सुलट चर्चा सुरू आहेत. अशा वातावरणातचं महायुतीमधील घटकपक्ष असलेल्या राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या मावळत्या






आमदाराने खळबळजनक गौप्यस्फोट केले आहेत.

आष्टी पाटोदा शिरुर या मतदारसंघात महायुतीमध्ये मैत्रीपूर्ण लढत झाली. येथे भाजपकडून सुरेश धस उमेदवार होते. भाजपमधील बंडखोर भिमराव धोंडे अपक्ष होते. तर, राष्ट्रवादी अजित पवार यांच्या पक्षाकडून मावळते आमदार बाळासाहेब आजबे यांना उमेदवारी देण्यात आली होती. तसंच, राष्ट्रवादी शरद पवार यांच्या पक्षाकडून मेहबूब शेख यांना उमेदवारी देण्यात आली होती. या लढतीत सुरेश धस यांनी सुमारे ७८ हजारांच्या फरकाने विजय मिळवला. तर बाळासाहेब आजबे हे चौथ्या क्रमांकावर फेकले गेले. या सगळ्या गोष्टींवर आजबे यांच्याशी लेट्सअप मराठीशी संवाद साधला आहे. त्यामध्ये त्यांनी अनेक

▶▶ उर्वरित पान २ वर



# एड्स प्रतिबंधामध्ये युवकांची मोलाची भूमिका

**आज ०१ डिसेंबर जागतिक एड्स दिन. या जागतिक एड्स दिनानिमित्त २ डिसेंबर ते ९ डिसेंबर २०२४ या सप्ताहामध्ये एड्स जनजागृती सप्ताह अभियानामध्ये जिल्हा रूग्णालयाकडून विविध जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात आपण सर्वांनी सहभागी होऊ या सामाजिक ऋण तसेच राष्ट्रीय कार्यास हातभार लाऊया या दिनानिमित्त हा विशेष लेख**

*भला जन्म हा तुला लाभला खुलास*
*हदयी बुधा धरिसी तरी हरिचा सेवक सुधा*

सुप्रसिद्ध लावणीकार, कवी राम जोशी मानवी नरदेहाबाबत वर्णन करताना ही लावणी गायलेली आहे. चौऱ्यांशी दशलक्षकोट्या योन्या फिरल्यानंतर मानवाला दुर्लभ असा नरदेह प्राप्त होतो. त्यामुळे त्याने या देहाचा उपयोग विधायक कार्यासाठी करणे आवश्यक आहे. परंतु आज वाढती व्यसनाधिनता नैतिक मुल्याचा ऱ्हास, तसेच सहजीवनाचा वाईट परिणाम देशातील लोकांवर मुख्यत्वे करुन युवकांवर पडत असलेला पहावयास मिळत आहे. त्याचा परिणाम देशाची भावी आधारस्तंभ असणारी तरुण पिढी ही एचआयव्ही संक्रमणाला बळी पडत असलेली पहावयास मिळते. मानवी भावना या नैसर्गिक असतात. परंतु या भावनांचा उद्रेक म्हणजेच विनाशास निमंत्रण असते. त्यामुळे त्यामध्ये सुवर्णमध्य साधणे आवश्यक असते.

### • तारुण्याचे तीन 'त'कार

संयम हा मनुष्याच्या डोक्याचा आत्मा आहे, असे थोर विचावंत व तेजस्वी महापुरुष श्री स्वामी विवेकानंद यांनी सांगितले आहे. तसेच तेजस्वीतता, तपस्वीतता, तत्परता हे तारुण्याचे तील त कार आहेत. हे प्रत्यक तरुण-तरुणीमध्ये असले पाहिजेत. परंतु खरोखरच हे तिन्ही गुण आपल्या स्वतः मध्ये आहेत का ? या प्रश्नाचे आत्म संशोधन करण्याची आज वेळ आली आहे. कारण नैतिक शिक्षण आवश्यक झालेले आहे. त्यामुळे व्यक्तीला गतिमानता प्राप्त होण्यास मदत होईल. आजचा युवक व्यसनरूपी चक्रव्युव्हामध्ये अडकत आहे. ज्याचे पर्यावसन १५ ते ४९ या वयोगटातील लोकच आज जास्तीत जास्त व्यसनाधीन, एचआयव्ही बाधित पहावयास मिळताहेत.

एचआयव्ही संक्रमणाला बळी पडण्याचे महत्त्वाचे कारण हे या रोगाबद्दल असलेले अपुरे ज्ञान. तारुण्य अवस्थेतील जल्लोष आहे. त्यामुळे आजच्या युवांनी या आजाराबाबत प्रशिक्षित समुपदेशक, सल्लागार यांच्या मार्फत शास्त्रीय माहिती घेणे आवश्यक आहे. आयसीटीसी केंद्र यामध्ये (दिशा केंद्रामध्ये) येणाऱ्या सर्व व्यक्तींना एचआयव्ही, एड्स बाबत संपूर्ण शास्त्रीय माहिती दिली जाते. तसेच त्यांच्या संमतीनेच त्यांची एचआयव्ही चाचणी केली जाते. चाचणीपूर्व तपासणीमध्ये चाचणी नंतरच्या निष्कर्षाबाबत समोरील व्यक्तीला कल्पना दिली जाते.



तपासणीबाबत पूर्णपणे गोपनीयता ठेवली जाते. चाचणी पश्चात समुपदेशनामध्ये समोरच्या व्यक्तीच्या मानसशास्त्रीय मुल्याचा अभ्यास करुन त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना समुपदेशन केले जाते.

*गळणाऱ्या पानांकडे नसते झाडाचे कधी लक्ष*
*नव्या पालवीलाच असते गोंजारण्यात ते दक्ष*

तात्पर्य, परिवर्तन हा काळाचा नियम आहे. या चराचर सृष्टीची निर्मिती ज्या निर्मिकाने उदात्त धोरणाने केली, तो उद्देश सफल करणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. संस्कृतीचा वारसा आपण जोपासला पाहिजे. परंतु नवीन इंटरनेट, फेसबुक, व्हॉट्सअप च्या संस्कृतीमध्ये आपण आपली जुनी संस्कृती, नितीमुल्य पायदळी तुडवता कामा नये. वाढती फॅशन, अंगप्रदर्शन तसेच संयमहीन जीवन यामुळे आपण आपले अस्तित्वच विसरत चाललो आहोत. खऱ्या अर्थाने युवकांनी एड्समुक्त महाराष्ट्र, भारत स्वप्न नव्हे ध्येय, हे वाक्य खरे ठरवायचे असेल तर वरील सर्व बाबींचा सारासार विचार करायला हवा.

### • एकटे नाहीत तुम्ही - साथ आहोत आम्ही

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष कार्यरत आहे. या कक्षांतर्गत विविध आयसीटीसी मार्फत युवकांसाठी एचआयव्ही, एड्स जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन, शिबिरे, चर्चासत्रे, परिसंवाद, पोस्टर प्रदर्शन इत्यादी उपक्रम, विविध स्पर्धांचे आयोजन वेगवेगळया लक्ष्यगटांमध्ये केले जाते.

यावर्षीचे जागतिक एड्स दिनाचे घोषवाक्य आहे ढरज्ञश ढहश ठळसहीं झरींह मार्ग हक्काचा, सन्मानाचा ! हे आहे. म्हणजेच एचआयव्ही संसर्गित लाभार्थ्यांना पण सर्व सामान्य नागरिकांसारखे हक्क आहेत, ते वेगळे नाहीत. त्यांना समाजामध्ये सम्मानाची व आदराची वागणूक दिली पाहिजे. सर्व कौटुंबिक सामाजिक कार्यक्रमांमध्ये सहभागी करुन घेणे आवश्यक आहे, नव्हे तो त्यांचा हक्क आहे. यासाठी भारत सरकारने हक्काची जोपासणा करण्यासाठी एचआयव्ही प्रतिबंध व नियंत्रण कायदा २०१७ अंमलात आणला आहे. ज्या कायद्याद्वारे एचआयव्हीसह जीवन जगणाऱ्या व्यक्तींना सम्मानपूर्वक वागणूक प्रदान करण्यात आली आहे. जर कोणी कलंकित करत असेल किंवा भेदभाव करत असेल, तर कायद्याने त्यांना शिक्षा देण्यात आली आहे. यावर्षीच्या घोषवाक्यानुसार एकटे नाहीत तुम्ही साथ आहोत आम्ही ही आम्हीपणाची भावना एचआयव्हीसह जीवन जगणाऱ्या लाभार्थ्यांच्या मनामध्ये विविध जनजागृती कार्यक्रमाच्या माध्यमातून वाढीस लावणे आपले सर्वांचे कर्तव्य आहे.

चला तर मग आजच्या ०१ डिसेंबर या जागतिक एड्स दिनानिमित्त २ डिसेंबर ते ९ डिसेंबर २०२४ या सप्ताहामध्ये एड्स जनजागृती सप्ताह अभियानामध्ये आपण सारेजन सहभागी होऊ या सामाजिक ऋण तसेच राष्ट्रीय कार्यास हातभार लाऊया एचआयव्हीबद्दल अधिक विस्तृत माहितीसाठी १०९७ टोल फ्री क्रमांकावर आपण माहिती विचारु शकता किंवा जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय, बीड येथे प्रत्यक्ष संपर्क साधावा.

**-सुहास मनोहरराव कुलकर्णी**
**(जिल्हा आयसीटीसी पर्यवेक्षक)**
**जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष,**
**जिल्हा रुग्णालय, बीड**

## बालकांच्या पालक, नातेवाईकांचा शोध घेण्याचे जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांना आदेश

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या बालकल्याण समितीने शासकीय मुलांचे निरीक्षण गृह, बालगृह येथील सनी गायकवाड, प्रीतम काळे या बालकांच्या पालक व नातेवाईकांचा शोध घेण्यासाठी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मंगेश जाधव यांना आदेशित केल्याचे त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

ही दोन्ही बालके शासकीय मुलांचे निरीक्षण गृह, बालगृह येथे काळजी व संरक्षणासाठी बाल कल्याण समितीच्या



सनी राजू गायकवाड



प्रीतम दत्तात्रय काळे

आदेशाने दाखल झाली आहेत. या दोन्ही बालकांना निरीक्षण गृह, बालगृह येथे दाखल झाल्यापासून कोणीही आई-वडील व इतर नातेवाईक भेटण्यास आले नाही. सदरील वृत्त प्रसारित झाल्यापासून ३० दिवसाच्या आत जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, बीड, बाल कल्याण समिती, बीड व अधीक्षक, शासकीय निरीक्षण गृह, बालगृह, बीड तसेच संस्थेच्या चाँदमारी क्वार्टर, पालवन चौक, बीड या पत्त्यावर अथवा अधीक्षक (मो. क्र.९९२२९८८८०६) यांच्याशी संपर्क करावा. अन्यथा बाल कल्याण समिती या बालकांबाबत योग्य ते कायदेशीर निर्णय घेईल. मुदत संपल्यानंतर कोणताही दावा अथवा हक्क बाल कल्याण समिती ग्राह्य धरणार नाही. सनी राजू गायकवाड याचा जन्म १० जून २००७ रोजीचा आहे. त्यांचे वय १७ वर्ष ०४ महिने आहे. सध्याचा त्याचा पत्ता बीड येथील शासकीय निरीक्षण गृह, बालगृह आहे. बेवारस अवस्थेत ते सापडले होते. बाल कल्याण समितीच्या आदेशाने या बालकास एक ऑक्टोबर २०१३ रोजी बालगृहात दाखल केले. बालकाचा रंग सावळा असून हनुवटीवर तीळ आहे. प्रीतम दत्तात्रय काळे याचा जन्म २६ जुलै २०१३ रोजीचा आहे. त्याचे वय ११ वर्ष ०२ महिने असून तो सध्या बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील शिराळ येथील शासकीय निरीक्षण गृह, बालगृह असा त्याचा सध्याचा पत्ता आहे. हा बालक घरातून निघून गेला होता. तो बालगृहात बाल कल्याण समिती, बीड यांच्या आदेशाने २९ डिसेंबर २०२३ रोजी दाखल झाला. हा बालक रंगाने गोरा असून मानेवर उजव्या बाजूला तीळ आहे, असेही त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात कळवले आहे.

## आमदार प्रकाश सोळंके यांना कॅबिनेट मंत्रीपद द्या : तालुका उपाध्यक्ष तोफीक लाला यांची पक्षश्रेष्ठींकडे मागणी

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विकास प्रिय नेतृत्व आमदार प्रकाश सोळंके यांनी थेट आमदारकीची निवडणूक न लढवता जिल्हा परिषद पासून आपल्या राजकीय प्रवासाचा श्री गणेशा केला जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती, आमदार, राज्यमंत्री, साखर कारखान्याचे चेअरमन, राज्य साखर संघाचे उपाध्यक्ष आणि मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष या विविध पदांवर त्यांनी कार्य केले आहे. व सध्या करत आहेत माजलगाव विधानसभा मतदार संघातील विकासाचा पाईक म्हणून ओळखले जाणारे आमदार प्रकाश सोळंके यांनी आपल्या राजकीय प्रवासात अनेक महत्वपूर्ण कामगिरी बजावली असून त्यांच्या निष्काम सेवेमुळे मतदार संघाचा सर्वांगीण विकास झाला आहे. त्यामुळे त्यांना होणाऱ्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री पद देण्याची मागणी माजलगाव राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे तालुका उपाध्यक्ष तोफीक लाला यांनी पक्षश्रेष्ठींकडे केली आहे

आ.प्रकाश सोळंके यांनी माजलगाव मतदार संघात सिंचन, वीज, दळणवळण, शिक्षण आणि औद्योगिक विकासावर भर दिला. शेतकऱ्यांसाठी सिंचन योजना, गावोगावात वीज पुरवठा,



माजलगाव शहराची राष्ट्रीय महामार्गांशी जोडणी आणि माजलगाव धारूर येथील औद्योगिक वसाहत त्यांच्या महत्वाच्या कामगिरीचे प्रमुख उदाहरण आहेत. या विकास कामांमुळे मतदार संघातील बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत.

माजी उपमुख्यमंत्री लोकनेते स्वर्गीय सुंदरराव सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली राजकीय कार्यात सक्रिय झालेले आ. प्रकाश सोळंके हे कोणत्याही प्रकारचा जातीय भेदाभाव न करता सर्व जाती-धर्मातील लोकांना एकत्र घेऊन चालणारे समावेशक नेतृत्व म्हणून ओळखले जातात. त्यांच्या निष्काम सेवेमुळे ते पाच वेळा माजलगाव मतदार संघाचे आमदार झालेले असून त्यांची लोकप्रियता अफाट आहे. त्यामुळे आ.सोळंके यांचा गठीत होणाऱ्या महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री म्हणून पक्षश्रेष्ठींनी संधी द्यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे तालुका उपाध्यक्ष तोफीक लाला यांनी पक्षश्रेष्ठींकडे केली आहे.

## बालकांचे हक्क यावर जनजागृतीपर कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद



**बीड । प्रतिनिधी**

बाल हक्क सप्ताहानिमित्त 'बालकांचे हक्क' या विषयावर शहरातील तेलगाव रोड येथील राजर्षी शाहू कन्या माध्यमिक विद्यालयात प्रमुख, जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष आनंद यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवार (ता.२८) जनजागृतीपर कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव जी.जी. सोनी केले. युनिसेफच्या वतीने सोनिया हंगे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी विधीदूत मिथुन जोगदंड यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पुढाकार घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंजि. बलभीमराव जाहेर पाटील होते. सूत्रसंचालन श्री.तिडके यांनी केले. शाळेच्या मुख्याध्यापक श्रीमती कदम यांनी आभार मानले.

## राजपत्रित नागरी सेवा पूर्व परीक्षाय केंद्र परिसरात मनाई आदेश लागू ; आज परीक्षा

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत होणारी महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा पूर्व परीक्षा रविवारी (ता.१ डिसेंबर) बीड जिल्हा केंद्रात १० उपकेंद्रामधून घेण्यात येत आहे. ही परीक्षा शांततेत, सरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने उपकेंद्राच्या १०० मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे मनाई आदेश लागू असल्याचे अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी कळविले आहे.

परीक्षेच्या कामकाजासाठी नियुक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांना आदेश लागू नाहीत. परीक्षा केंद्राबाहेर व परिसरात परीक्षेसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी व परीक्षार्थी यांना वगळून दोन किंवा दोनपेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. परीक्षा केंद्राचे परिसरात



सर्व ध्वनीक्षेपके इ.परीक्षा सुरू होण्याच्या एक तासापूर्वी ते परीक्षा पेपर संपेपर्यतच्या कालावधीपर्यंत चालू ठेवण्यासाठी प्रतिबंध करण्यात येत आहे. शासकीय व परीक्षेसंबंधित कर्मचाऱ्यांच्या व विद्यार्थ्यांच्या वाहना व्यतिरिक्त इतर अनाधिकृत वाहनांना परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात येण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. हे आदेश कोणत्याही धार्मिक कार्यक्रमास, अंत्ययात्रेसाठी लागू राहणार नाहीत, असेही आदेशात नमूद आहे.

बीड शहरातील नगर रोड येथील चंपावती माध्यमिक विद्यालयात ४८०, नवीन भाजी मंडई परिसरातील संस्कार विद्यालयात ४३२, धानोरा रोड येथील भगवान विद्यालय आणि कॅनॉल रोड येथील शिवाजी विद्यालयात प्रत्येकी ३६०, नगर रोड येथील चंपावती इंग्लीश स्कूल, चंपावती प्राथमिक विद्यालय, शिवाजी नगर येथील सौ.के.एस.के. महाविद्यालय, सुभाष रोड येथील गीता कन्या प्रशाला, किल्ला मैदान येथील बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय व श्री. छत्रपती शाहू माध्यमिक विद्यालयात प्रत्येकी उपकेंद्रावर २४० अशी एकूण ३०७२ विद्यार्थी संख्या आहे, असेही आदेशात नमूद आहे.

पान १/४ वरून पुढे.....

## वाळू माफियांनी...

पकडण्याची घटना ताजी असतानाच वाळू तस्करीच्या विरोधात कारवाईसाठी गस्तीवर असलेले उपजिल्हाधिकाऱ्यांच्च्या वाहनाचा वाळू माफियांनी पाठलाग करुन त्यांच्या वाहनाला धडक देत जिवे मारण्याची धमकी दिली. ही घटना गुरुवारी रात्री, माजलगाव तालुक्यातील टाकरवण- शेलगावथडी येथे घडली.या प्रकरणी उपजिल्हाधिकारी गौरव इंगोले यांच्या तक्रारी वरून दोघांवर माजलगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आलआहे. दुसरीकडे बीड तालुक्यातील मांजरसुंब्या जवळ अवैध वाळूवाहतूक करणारा ट्रक बीडच्या नायब तहसीलदार प्रशांत जाधववर यांनी पकडून पाच ब्रासवाळू जप्त केली आहे. सदरील ट्रक नेकनूर पोलिसांच्या ताब्यात दिला आहे.माजलगाव तालुक्यात वाळूमाफियांच्या विरोधात तहसीलदार व उपजिल्हाधिकाऱ्यांनी कारवाईची मोहीम सुरू केली आहे. माजलगावचे उपविभागीय अधिकारीगौरव इंगोले यांच्या तक्रारीवरुन, माजलगाव ग्रामीण पोलिस ठाण्यातगुन्हा दाखल झाला आहे.साहेब इकडे फिराल तरयाद राखा, गाठ आमच्याशी आहे अशी धकमी दिली.माजलगावचे उपजिल्हाधिकारी इंगोले यांनी पाठलाग करणाऱ्या वाहन चालकांची चौकशी केली असता साहेब तुम्ही ईकडे काय करताय, इकडे फिरु नका, इकडे फिराल तर याद राखा, अशी धमकीदेत त्यांच्या वाहनाला धडक देऊन जिवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी उपजिल्हाधिकारी गौरव इंगोले यांच्या तक्रारीवरुन करण सोमनाथ मोटे व संजय रामदास पवार यांच्यावर गुन्हा नोंद करण्यात आला.

## मोबाईल हिसकावून....

घेत असतांना गुप्त बातमी मिळाली की, निखील लक्ष्मण घाडगे रा. दौनापुर याचेकडे चोरीचा १० प्लस मोबाईल असुन तो मुकुंदराज सभागृह समोर आहे अशी खात्रीशिर माहिती मिळाल्यावरुन स्था.गु.शा. पथकाने तात्काळ रवाना होवुन नमुद ठिकाणावरुन मोबाईल चोराना ताब्यात घेतले. त्याचे आधी चौकशी केला असता त्याच्याकडे दुचाकी चोरीच्या असल्याची माहिती उघड झाली ही कारवाई बीड पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पो..नी. उस्मान शेख, पो.नी. घोळवे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उप. सुशांत सुतळे, हनुमंत खेडकर, मारुती कांबळे, बाळकृष्ण जायभाय, अश्विन सुरवसे, राजू पठाण, नितीन वडमारे यांनी केली.

## जागतिक एड्स...

सुभाष रोड- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक - बस स्टँड - श्री. छत्रपती शिवाजी महाराज चौक या मार्गाने मार्गस्थ होणार आहे. सामाजिक न्याय भवन बीड येथे या प्रभात फेरीचा समारोप होईल. जिल्हास्तर व वैद्यकीय महाविद्यालय स्तरावर एआरटी केंद्रामध्ये उपचार घेणाऱ्या एचआयव्ही संसर्गित बालकांसाठी चित्रकला (पोस्टर स्पर्धा) होणार आहे. त्यासाठी माझ्या स्वप्नातील भारत, स्त्री-पुरुष समानता, एचआयव्ही, एड्स जनजागृती असे विषय आहेत. यामध्ये गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विजेत्यांना अनुक्रमे रु.१५००, रु.१०००, रु.५०० असे बक्षीस व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

विविध रेड रिबन क्लब महाविद्यालयांमध्ये जिल्हास्तर व तालुकास्तरावर एचआयव्ही, एड्सबाबत व्यापक जनजागृती व्हावी या उद्देशाने जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. यामध्ये फ्लॅश मॉब, पोस्टर प्रदर्शन आदींचे आयोजन करण्यात येणार आहे, असेही त्यांनी कळविले आहे.

## धनंजय मुंडेंनी...

धक्कादायक दावे, खुलासे केले आहेत. मी भाजपमधून राष्ट्रवादीमध्ये जो प्रवेश केला तो फक्त धनंजय मुंडे यांच्या आग्रहाखातर केला. त्यांच्या मनेवर मान टाकून मी तो प्रवेश केला होता. परंतु, या निवडणुकीत धनंजय मुंडे यांनी मला आवश्यक होती ती साथ दिली नाही. माझ्याशी दगाफटका झाला असा थेट आरोपच आजबे यांनी केला आहे. त्यांनी जर माझ्या प्रचाराचे सुत्र हाती घेतले असते तर चित्र काही वेगळ दिसलं असतं असही आजबे यावेळी म्हणाले. त्यांच्या या आरोपांनंतर आष्टी मतदारसंघात आता वेगवेळ्या चर्चा रंगल्या आहेत. कारण, निवडणुकीचा निकाल लागताच विजयी उमेदवार सुरेश धस यांनी पंकजा मुंडे यांच्यावर गद्दारी केल्याचा आरोप केला. आपल्याला त्यांनी फसवल असा आरोप केला होता. त्यांनंतर आता आजबे यांनीही धनंजय मुंडेंवर आरोप केल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

विद्यमान आमदार असताना फक्त २२ हजार मतदान पडलं याबद्दल आजबे म्हणाले हा पराभव मला मान्यच नाही. कारण माझ्या सभा, माझे दौरे मी पाहतो. यामध्ये मला काहीतरी गडबड वाटेत असं म्हणत आजबे यांनी ईव्हीएम मशीनवरच शंका उपस्थित केही आहे. त्याचबरोबर, जर हे मतदान खर असेल तर चांगल्या माणसाने राजणात राहू नये या मताचा मी आहे अशी खंतही आजबे यांनी यावेळी व्यक्त केली आहे. कारण, लोकांची काम केली, अनेक नवी काम आणली. परंतु, आपल्याला या पद्धतीचं मतदान होत असेल तर आपण या मार्गावर असू नये या मताचा मी आहे. आणि पुढच्या पिढीलाही यामध्ये आपण पाठवावं की नाही असा विचार आपण करत असल्याचंही आजबे यावेळी म्हणाले.

## शालेय साहित्य ...

दृष्टिकोन बाळगून अंधश्रद्धे पासून दूर राहणे हे स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून महापुरुषांच्या जयंती, स्मृतिदिनी त्यांच्या विचारावर चालण्याचा दृढ निश्चय करून प्रयत्नाची पराकाष्टा करावी असे आवाहन केले. कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे सीनियर के.जी. मधील आदिरा वडमारे या बालिकेने पाच ओळी संविधाना बद्दल इंग्रजीतून सुस्पष्टपणे भाषण केली त्याबद्दल तिचा वाचाल तर वाचाल वाचनालया तर्फे व महामानव अभिवादन ग्रुप तर्फे रोख रक्कम देऊन सत्कार केला. कार्यक्रमास अनिल वीर, प्रकाश खंडारे, रोहन खंडारे, संगीता खंडारे, मोतीराम मस्के, नागसेन मस्के, गुलाबराव बिक्कड गोदावरी पटेकर, रत्नमाला चक्रे, राधाबाई वीर, अनिल वीर, बाईजाबाई वीर, ज्योती शिरसाठ व परिसरातील बहुसंख्य विद्यार्थी व पालकांची उपस्थिती होती.

## हिंदूंना मते...

सुलतान जयंतीचे अध्यक्ष आक्रम सौदागर, उपध्यक्ष दादाराव रोकडे, सचिव रूशी करडे, सल्लागार पत्रकार आल्ताफ कुरेशी, कोषाध्यक्ष शेख एजाज, रोहित लिबे, शेख नदीम, मोयोदिन इनामदार, आफसर भाई शेख, पत्रकार डॉ सुरेश गांधले, शेख अतिख, महेश मरकड, अरूण डोंगरे, शेख रहीम, आसद सौदागर, इम्रान कुरेशी, छोट्या पठाण, कृष्णा मोरे, इम्रान शेख, खैसर शेख, वसीम सौदागर, वाजेद कुरेशी, शेख नाजेर, सोनु शेख, इस्राईल शेख, आमर वादे, या वेळी युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते

## कोट्यवधींची प्लॉट...

१००० रूपये दंडाची रक्कम वाढवून ५० हजार रुपये दंडाची रक्कम आकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. निसर्गाचा -हास थांबविण्यासाठी पर्यायाने पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी वृक्षतोडीला आळा घालण्यासाठी वन विभागाकडून कठोर कारवाई करण्याची आवश्यकता आहे तसेच वृक्षतोड करून अवैध वाहतूक केल्यास १९२७ चे कलम ४२ नुसार सदर वाहन व साहित्य जप्त करून १ वर्ष कारावास किंवा ५००० रूपये दंड किंवा दोन्ही शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. मात्र वनविभागातील अधिकारी आणि जिल्हा प्रशासन केवळ कागदी घोडे नाचवण्यात व्यस्त दिसून येत आहे. जिल्हा प्रशासनाला याचे गांभीर्य नसुन नियम केवळ कागदावरच असल्याची खंत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केली आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# बीड जिल्ह्यातील ६०% युवक तरुण उसाच्या फडात !

## ऊसतोड मजुरांच्या मुला मुलींचं स्थलांतर कधी थांबणार ? ; मजुरांच्या मुला मुलींचे ४ महिने शैक्षणिक नुकसान





**वडवणी । प्रतिनिधी**

बीड जिल्हा ऊसतोड मजुरांचा जिल्हा आहे . सर्वता ही बीड जिल्ह्याला लागलेली कीड आहे. बीड जिल्हा म्हटलं महाराष्ट्र असो की कर्नाटक समोरच्यांना विचारलं की आपला कुठला जिल्हा, तर आपण म्हणलो ना बीड, तर नकळत समोरच्या गालावर हसू येत. आणि कर्नाटक मध्ये त्याला गाबाळे जिल्हा असे म्हणतात. कारण ऊसतोड मजूर हे आपलं बिऱ्हाड पाठीवर बांधून आपल्या पोटाची कोळी भरण्यासाठी, त्यांच्या राज्यात किंवा मग आपल्याच राज्यात पश्चिम महाराष्ट्रात. चार महिन्यासाठी स्थलांतर करत असतात. यामध्ये ऊसतोड मजुरांचे अनेक प्रश्न आहेत. त्यांच्या मुलांच्या शैक्षणिक मोठे प्रश्न आहेत हे महायुती सरकार, यांच्या शैक्षणिक नुकसान होत आहे. याकडे पाहणार का ? ऊसतोड मजूर हे यावेळेस पंकजाताई मुंडे यांच्या बाजूने म्हणजे महायुतीच्या बाजूने उभा होते. ऊसतोड मजुरांच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न महायुती सरकार करेल का. ? बीड जिल्ह्यातील साठ टक्के तरुण हे घे उचल निजा कारखान्याला हेच करत आहेत. तरुण पिढी ही सध्या व्यसनाधीन होत आहे. कारण ऊस तोडीचे काम हे खूप कठीण काम आहे. त्यामुळे ऊसतोड मजूर मुकादम वाहतूकदार हे संपूर्ण व्यसनाधीन होत झाले आहे . याच बीड जिल्ह्यातील ऊसतोड मजुरांच्या मुलांचे शिक्षणाचा मोठा प्रश्न निर्माण आहे.

महाराष्ट्र राज्य ऊसतोड मजूर मुकादम वाहतूक संघटना राज्य संघटक बी.भांगे यांनी मुलाखतीत काय म्हणाले

सध्या बीड जिल्ह्यामध्ये सर्वात मोठा प्रश्न निर्माण झाला आहे तो म्हणजे रोजगारीचा. बीड जिल्ह्यात रोजगार उपलब्ध होणं म्हणजे, समुद्रात सुई सापडण्यासारखं ? बीड जिल्ह्यात ची ओळख ऊसतोड मजुरांचा जिल्हा हीच आहे. इथे घे उचल घे पाठीवर गबाळ याला उचल त्याला उचल हा पळाला तो बाळाला, त्याने त्याला टाकलं हेच ऐकायला भेटतं , या तीन महिन्या च्या कालावधीमध्ये. कोण कोणाला फसवल, ते मात्र सांगता येत नाही. कारण इथे रोजगार मिळणं म्हणजे समुद्रात स्वी सापडणं. आज पर्यंत स्वर्गीय लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या कालावधीपासून आजपर्यंत, ऊसतोड मजुरांना फक्त आश्वासनच मिळत गेलीत. कित्येक वेळा सांगण्यात आलं की ऊसतोड मजुरांसाठी महामंडळ स्थापन करू हे करू ते करू मात्र केलं काहीच नाही. अन जर केला असेल तर ऊसतोड मजुरांच्या जीवावर राजकारण करणाऱ्यांनी सर्व उत्तर मजुरांना त्या पाचटातील दोन वर्षाच्या लहान बाळाला विचारा त्याच्या आईला पाना येतोय का.? घामाचा रत्ताच्या प्रत्येक थेंबापासून केलेल्या या कष्टाला योग्य मोबदला मिळणार का ? काही कारखानदारांनी दिलेला नाही.? त्यांचं काय मुकादम आणि तर दिलेला आहे. काही मजुरापर्यंत ३४ टक्के वाढ पोचलीच नाही.? त्यासाठी काही उपाययोजना होणार का? ज्या कारखानदारांनी वाढ दिली नाही त्यांच्यावर कारवाई होणार का.? त्यांचं गळीत हंगाम रद्द होणार का ? आता सध्या विधानसभा निवडणुका महाराष्ट्रात होऊन गेल्या. आम्ही ऊसतोड मजुरांचे नेते ऊसतोड मजुरांच्या जीवावर राजकारण करणारे बीड जिल्ह्यातील व महाराष्ट्रातील नेते दरवर्षीप्रमाणे याही वर्षी यांच्या शब्दाला जागून संपूर्ण जिल्ह्यातील व महाराष्ट्र राज्यातील ऊसतोड मजूर महायुती सरकारसोबत होता. मग आता महायुती सरकार स्वतंत्र महामंडळ स्थापन करून मजुरांचा दर्जा देईल का. त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न होईल का? का एक वर्षी प्रमाणे याही वर्षी फक्त आश्वासनच मिळतील.? हे मात्र पाहण्यासारख असणार आहे. असे मत महाराष्ट्र राज्य ऊसतोड मजूर मुकादम वाहतूकदार संघटना राज्य संघटक बी भांगे यांनी मुलाखतीत सांगितले आहे.

### ● तो प्रश्न नेमका कधी सुटणार ?

**पिढ्या न पिढ्या ऊसतोड मजूर ऊस तोडणार का ? त्यांची मुलं शिक्षणापासून चार महिने वंचित असतात त्याकडे आता खरंच महायुती सरकार पाहणार का ? ऊसतोड मजुरांना मजुराचा दर्जा ऊसतोडमजूर महामंडळ स्वतंत्र स्थापन होऊन सर्वच ऊसतोड मजुरांपर्यंत ती मदत त्या देत असलेल्या सुविधा यांचा लाभ मिळेल का ? याकडे महायुती सरकारने पाहिलं पाहिजे असं मत, उतोडमजुरांमधून मत व्यक्त होत आहे.**

---

## बीडच्या विकासासाठी डॉ. योगेश क्षीरसागर यांना विधान परिषदेत घ्यावे : नितीन जोगदंड

**बीड । प्रतिनिधी**

बीड विधानसभेत डॉ.योगेश क्षीरसागर यांना अवघ्या ५००० मतांनी निसटता पराभव स्वीकारावा लागला. मात्र बीड मतदार संघाचा विकास करावयाचा असेल तर डॉ.योगेश क्षीरसागर यांना विधान परिषदेत संधी द्यावी अशी मागणी नितीन जोगदंड यांनी केली आहे.

बीड मतदारसंघाची निवडणूक ही जातीपातीच्या राजकारणामुळे गाजली. यावेळी विकास कामांच्या मुद्द्यावर मतदान न होता जाती धर्मावर मतदान करण्यात आले. यामुळे डॉ. योगेश क्षीरसागर यांना पराभव स्वीकारावा लागला. डॉक्टर योगेश क्षीरसागर यांनी मा.अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केल्यापासून बीड मतदार संघात अनेक विकासाची कामे झाली. डॉ.योगेश क्षीरसागर आणि डॉ.सारिका क्षीरसागर यांनी अजित दादा पवार आणि धनंजय मुंडे यांच्याकडे मागील एक ते दीड वर्षापासून सातत्याने पाठपुरावा करत मोठ्या



प्रमाणात निधी उपलब्ध करून आणला. त्या माध्यमातून बीड मतदार संघातील शहरी आणि ग्रामीण भागात अनेक विकासाची कामे केल्यामुळे त्यांचा विजय हा निश्चित मानला जात होता. मात्र बीडच्या काही ठराविक भागातील जनतेने विकासाकडे दुर्लक्ष करत जाती धर्मावर मतदान केल्याचे चित्र स्पष्ट पहावयास मिळाले. राज्यात महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाल्याने महायुतीचे सरकार स्थापन होणार आहे. मात्र त्या सरकार मध्ये बीड चा आमदार सत्तेत नसल्याने बीड चा विकास कुठे तरी संथ गतीने होणार आहे. मात्र बीडच्या विकासासाठी कायमच प्रयत्नशील असणाऱ्या डॉ. योगेश क्षीरसागर यांना बीड मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. अजित दादा पवार साहेबांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या कोट्यातील रित्या झालेली विधानपरिषदेच्या जागेवर संधी द्यावी, अशी मागणी नितीन जोगदंड यांनी केली आहे.



*गेवराई विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार श्री.विजयसिंह पंडित यांचा सत्कार करून शुभेच्छा देताना, रोहित लंबे, अमोल राठोड, रमेशजी राठोड, परमेश्वर पाबळे, संतोष पाबळे आदी छाया चित्रात दिसत आहेत.*

---

**महत्वाचे**

## बीड जिल्हाधिकारी पदाचा डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी स्वीकारला पदभार



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार जालना जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ (भा. प्र. से ) यांनी आज स्वीकारला. जिल्हाधिकारी अविनाश पाठक (भा. प्र. से ) प्रशिक्षणासाठी जात आहेत. त्यामुळे बीड जिल्हाधिकारी पदाचा कार्यभार त्यांनी जालना जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्याकडे सोपविला. जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ २७ डिसेंबरपर्यंत अभ्यागतांसाठी मंगळवारी आणि गुरुवारी उपलब्ध राहणार आहेत.

## डॉ.आपल्या कुटुंबियांना बीड शहराचे वाटोळे करण्यासाठी 30 वर्षे कमी पडले काय ? - खुर्शीद आलम

### भ्रष्टाचार रोखण्यासाठी आणि विकासकामेसाठी आत्मदहनाची वेळ कोणी आणली होती

**बीड । प्रतिनिधी**

अवघ्या काहीच दिवसांपूर्वी विधानसभेत पराभूत झाल्यानंतर आत्मचिंतन करण्याऐवजी डॉ.योगेश क्षीरसागर व डॉ.सारिका ताई क्षीरसागर यांनी पत्रकार परिषद घेऊन आ.संदीप क्षीरसागर यांच्यावर ताशेरे ओढत येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची तैयारी दर्शविली आहे, आश्चर्याची बाब म्हणजे बीड शहरातील मतदारांनी शहरातील विकासाच्या दृष्टीने सतत तब्बल तीस वर्षे डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांच्याकडे एकहाती सत्ता दिली होती. या सत्तेमध्ये डॉ.दिपाताई, डॉ.योगेश, डॉ. सारीकाताई हे सुद्धा सामील होते तरीही बीड शहराचा विकास तर सोडाच पण शहरातील लोकांना मुलभूत सुविधाही परिपूर्णरित्या डॉ.क्षीरसागर कुटुंबियांच्या सत्ताकाळात देता आल्या नाहीत! आता विधानसभेच्या पराभवानंतर स्थानिक स्वराज्य संस्था ताब्यात घेण्याच्या तयारीत असणाऱ्या डॉ.क्षीरसागर कुटुंबियांना खुर्शिद आलम यांनी बीड शहराचे वाटोळे करण्यासाठी ३० वर्षे कमी पडली काय? असा परखड सवाल पत्रकाद्वारे खुर्शिद आलम यांनी केला आहे.

डॉ.क्षीरसागर कुटुंबियांच्या सत्ताकाळात रोड रस्ते नाल्या वगैरे विकास झाले नाहीत. विकासकामे तर सोडाच पण या उलट भ्रष्टाचार वाढला त्यांना शहरातील नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी पुरवता आले नाही. शहर स्वच्छता ठेवता आला नाही. दहा दहा महिने खंब्यावरील स्ट्रीट लाईट बंद पडल्या त्यादेखील चालु करता आल्या नाहीत. अखंडित तब्बल तीस वर्षात बीड



शहरवासीयांना मुलभूत सुविधा उपलब्ध करून देता आल्या नाहीत. बीड नगरपालिकेत फक्त आणि फक्त नियमित भ्रष्टाचार दिसून आले म्हणून उच्चस्तरीय चौकश्या लागल्या. शहरातील विकासकामांसाठी आणि भ्रष्टाचाराच्या विरोधात कौन्सिल मध्ये आम्हाला स्वतःच्याच अंगावर रॉकेल ओतून घेऊन आत्मदहन करण्याची वेळ आली. तरीही डॉ.भारतभुषण क्षीरसागर, डॉ.दिपाताई क्षीरसागर, डॉ.योगेश क्षीरसागर यांना भ्रष्टाचार बंद करता आले नाही. म्हणूनच डॉ.योगेश क्षीरसागर यांना बीड विधानसभेच्या निवडणुकीत फटका बसला आहे. बीडची जनतेला आता आपला अजेंडा समजला आहे. असे असतांनाही आता पुन्हा नगरपरिषद ताब्यात घेण्याचे स्वप्न क्षीरसागर डॉक्टर पिता पुत्र पाहताना दिसत आहेत म्हणजेच डॉक्टर पिता पुत्राला बीड शहराचे वाटोळे करण्यासाठी ३० वर्षे पुरली नाहीत का? असा खडा सवाल बीड नगरपरिषदचे माजी सभापती तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदपवार पक्षाचे बीड शहराध्यक्ष खुर्शीद आलम यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे म्हटले आहे.

## स्वर्गातील मतदार आले आणि नातेवाईकांना न भेटता निघून गेले !

### मतदान झालेल्या अनेक मयत मतदार कुटुंबियांच्या भावनांशी झाला खेळ : राजेभाऊ फड

**परळी । प्रतिनिधी**

परळी वैजनाथ विधानसभा मतदारसंघात जवळपास ३१३ मतदान केंद्रावर बोगस मतदान झाले असल्याचे उघड होत आहे. काही ठिकाणी पैकीच्या पैकी मतदान झाल्याने संशय नव्हे तर खात्रीच झाली असून, अनेक गावातील मतदान केंद्रावर मयत झालेल्या मतदारांचे मतदान झाले आहे. स्वर्गात गेलेल्या मतदारांचे मतदान झाल्याचे प्रकार घडल्याने त्यांच्या कुटुंबाशी आणि आपला माणूस गमावल्याचे दुःख विसरण्याचा प्रयत्न करणाऱ्या कुटुंबाशी फार मोठा भावनिक खेळ केला जात असल्याचा आरोप राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी केला आहे.

लोकांनी लोकांसाठी लोकांकडून चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही असा त्याचा अर्थ होतो. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब



आंबेडकर यांनी आपल्या देशाला जगातील सर्वात मोठी आणि माणसाला माणसाप्रमाणे जगण्याचा हक्क देणारी राज्यघटना दिली आहे. मात्र घटनात्मक तरतुदी पायदळी तुडवून गुंडगिरी आणि दहशत माजवून लोकशाहीची हत्या केली जात आहे. त्यातल्या त्यात स्वर्गात गेलेल्यांनाही ही बोगस यंत्रणा सुखाने राहू देत नाही, दुःख विसरण्याचा प्रयत्न करणाऱ्या कुटुंबियांच्या दुःखावर मीठ चोळण्याचे प्रकार परळी मतदारसंघात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत घडले आहेत.

---

## राज्य अन्न आयोगावर नियुक्तीबद्दल ॲड.सुभाष राऊत यांचा अधिसभेत गौरव

**माजलगाव । प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्य अन्न आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल ॲड.सुभाष राऊत यांच्या अधिनंदनाचा ठराव विद्यापीठ अधिसभेत ठराव घेण्यात आला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अधिसभेची मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी (दि.३०) बैठक झाली. या बैठकीत अधिसभा सदस्य डॉ.नरेंद्र काळे यांनी अभिनंदनाचा ठराव मांडला.या ठरावस उपस्थित सर्व सदस्यांनी टाळ्याच्या गजरात अनुमोदन दिले. ॲड.राऊत हे महात्मा फुले समता परिषद राज्य उपाध्यक्ष, विद्यापीठ अधिसभा सदस्य, युवक महोत्सव सलल्लागर मंडळ सदस्य, नगरसेवक आदी पदावर कार्यरत राहिले आहेत. तत्कालीन अन्न पुरवठा मंत्री मा.ना.छगन भुजबळ यांनी सदर नियुक्ती केली आहे.

## लिंबागणेश उपकेंद्रातील अनागोंदी कारभारामुळे विजेअभावी रब्बी पिके धोक्यात ; महावितरणच्या विरोधात गुरूवारी रास्ता रोको

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश आणि पंचक्रोशीतील गावांमधील विजेच्या समस्येने तिव्र रुप धारण केले असुन दिवसभरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने तसेच कमी दाबाचा वीजपुरवठा होत असल्याने मुबलक पाणी उपलब्ध असुनही वीजे अभावी शेताला पाणी देता येत नसल्याने रब्बी हंगामातील कांदा ज्वारी,गहु, हरभरा आदी पिके वाळु लागल्याने शेतकऱ्यांना हातची पिके वाया जाण्याची धास्ती असुन लिंबागणेश येथील ३३ केव्ही.उपकेंद्रातील उप अभियंता पद २ महिन्यांपासून रिक्त असुन लाईनमन वेळेवर ड्युटी करत नसल्याने तसेच मुख्यालयी रहात नसल्याने रात्री अपरात्री ग्रामस्थांना



फ्युज टाकणे,केबल बदलणे आदी कामे करावी लागत असुन महावितरणच्या अनागोंदी कारभार विरोधात सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि.५ डिसेंबर गुरूवार रोजी अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावरील मांजरसुंभा ते पाटोदा दरम्यान लिंबागणेश बसस्थानक येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन कार्यकारी अभियंता महावितरण बीड यांना दिले आहे. निवेदनावर सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, बाळासाहेब मोरे,विक्की वाणी, हरिओम क्षीरसागर,अक्षय वाणी, महादेव कुदळे,जनार्धन वाणी, सय्यद बशीर, राजेंद्र ढास, श्रीकांत शिंदे, शिवाजी ढास, नानासाहेब



वायभट, संतोष भोसले, संजय पावले आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

वीजपुरवठा कमी दाबाचा असल्याने लिंबागणेश येथील पाणीपुरवठा बाधित : सरपंच बालासाहेब जाधव

लिंबागणेश आणि पोखरी (घाट) गावाला भायाळा साठवण तलावातुन पाणीपुरवठा होत आहे.मात्र कमी दाबाचा वीजपुरवठा विद्युत मोटारी सुरळीत चालत नाहीत. त्यामुळे गावाचा पाणीपुरवठा १५ दिवसांपासून बंद असुन पाण्यावाचुन ग्रामस्थांचे हाल होत आहेत. पोखरी ( घाट) येथुन पाणीपुरवठ्यासाठी स्वतंत्र फीडरची व्यवस्था करण्यात यावी.

लाईनमन मुख्यालयी नसल्याने ग्रामस्थांना रात्री अपरात्री फ्युज टाकावे लागते: हरिओम क्षीरसागर ( ग्रामस्थ)

लिंबागणेश येथील उपकेंद्रातील उप अभियंता पद अडीच महिन्यांपासून रिक्त असुन दिवसा कार्यालयात लाईनमन हजर नसतात.विजे संदर्भात फोन केला तर घेत नाहीत टाळाटाळ करतात. मुख्यालयी लाईनमन रहात नसल्याने रात्री अपरात्री फ्युज टाकणे आदी कामे ग्रामस्थांनाच जीव मुठीत धरून करावी लागतात. कारण गावठाण रोहित्रांची दुरावस्था असुन जळालेले केबल,उघडे वायर, झाडांच्या फांद्यामधुन गेलेल्या विजेच्या तारा सगळंच धोकादायक असुन एखादी दुर्दैवी घटना घडल्यास महावितरण कार्यालय जबाबदारी घेणार काय ? ? असा संतप्त सवाल ग्रामस्थ हरिओम क्षीरसागर यांनी केला आहे.

मराठवाडा पत्र

● dailymarathwadapatra2021@gmail.com ■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■ Mo. 9822152955



गेवराई मतदार संघाचे आमदार विजयराजे पंडित यांची आमदार पदी निवड झाल्याबद्दल सत्कार करताना व राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जिल्हा सरचिटणीस बप्पासाहेब घुगे ,सखाराम शेळके आदी छाया चित्रात दिसत आहेत.

# आ. प्रकाश सोळंके यांना कॅबिनेट मंत्रीपद द्या माजलगाव मतदारसंघातील जनतेची मागणी

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव विधानसभा मतदार संघाचे विकास प्रिय नेतृत्व आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी थेट आमदारकीची निवडणूक न लढवता जिल्हा परिषद पासून आपल्या राजकीय प्रवासाचा श्री गणेशा केला जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिति सभापती, आमदार, राज्यमंत्री, साखर कारखान्याचे चेअरमन, राज्य साखर संघाचे उपाध्यक्ष आणि मराठवाडा



शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष या विविध पदांवर त्यांनी कार्य केले आहे. व सध्या करत आहेत माजलगाव विधानसभा मतदार संघातील विकासाचा पाईक म्हणून ओळखले जाणारे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी आपल्या राजकीय प्रवासात अनेक महत्वपूर्ण कामगिरी बजावली असून त्यांच्या निष्काम सेवेमुळे मतदार संघाचा सर्वांगीण विकास झाला आहे.

प्रकाश दादा सोळंके यांनी माजलगाव मतदार संघात सिंचन, वीज, दळणवळण, शिक्षण आणि औद्योगिक विकासावर भर दिला. शेतकऱ्यांसाठी सिंचन योजना, गावोगावात वीज पुरवठा, राष्ट्रीय महामार्गांशी जोडणी आणि माजलगाव धारूर येथील औद्योगिक वसाहत त्यांच्या महत्वाच्या कामगिरीचे प्रमुख उदाहरण आहेत. या विकास कामांमुळे मतदार संघातील बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत. स्वर्गीय सुंदररावजी सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली राजकीय कार्यात सक्रिय झालेले दादा सोळंके हे जातीय भेदाभाव न करता सर्व जाती-धर्मातील लोकांना एकत्र घेऊन चालणारे समावेशक नेतृत्व म्हणून ओळखले जातात. त्यांच्या निष्काम सेवेमुळे ते पाच वेळा माजलगाव मतदार संघाचे आमदार झालेले असून त्यांची लोकप्रियता अफाट आहे. आता मतदार संघातील जनता त्यांना मंत्रीपद मिळावे अशी मागणी करत आहे.

## महत्वाचे

## युवकांनी नवं नवीन उद्योगात उतरावे : राजेंद्र मस्के

### मोहिनिनाथ अर्थमुहर्सचा शुभारंभ संपन्न..!



**बीड । प्रतिनिधी**

वाढती बेकारी आणि नोकऱ्यांचा तुटवडा लक्षात घेता तरुणांनी व्यवसाय उद्योगाकडे वळावे. गरज ही शोधाची जननी असून युवकांनी आपल्या परिसरात जनतेला आवश्यक असणाऱ्या विविध गरजांचा अभ्यास करून नव नवीन उद्योगात उतरून स्वावलंबी झाले पाहिजे, असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद चंद्र पवार पक्षाचे नेते, शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांनी मोहिनिनाथ अर्थमुहर्स शुभारंभ प्रसंगी व्यक्त करून, उपसरपंच लालासाहेब पन्हाळे व विलास काकडे यांना शुभेच्छा दिल्या. बोरफडी गावचे उपसरपंच लालासाहेब पन्हाळे व जरुड येथील युवा कार्यकर्ते विलास काकडे यांनी जेसीबी (पोकलेन) मशीनच्या माध्यमातून नवीन व्यवसायाला सुरवात केली. आज जरुड फाटा येथे मोहिनिनाथ अर्थमुहर्सचा शुभारंभ गोरक्षनाथ टेकडीचे महंत नवनाथ बाबा महाराज, भवानीगड संस्थानचे महंत अखंडानंद गिरी महाराज, जरुड संस्थानचे महंत नवनाथ महाराज यांच्या शुभहस्ते व शेतकरी मित्र राजेंद्रजी मस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी धनंजय गुंदेकर, पोपटराव शेंडगे, विजय सुपेकर, सुनील कुटे, कल्याण कुटे, विकास कुटे, सतीश काकडे, तौर महाराज, सरपंच श्रीराम काकडे, उपसरपंच पंजाब काकडे, सरपंच संदीप डावकर, विष्णू निर्मळ, सुधाकर मोरे, बाबा जगताप, सुरेश माने, बद्रीनाथ जटाळ, उपसरपंच अमोल खामकर, सरपंच राजेंद्र राऊत, सरपंच अशोक शिंदे, शामराव मोरे, विठ्ठल काळे, सुरेश काकडे, जालिंदर काकडे, सखाराम शिंदे, नंदकिशोर कदम यांच्यासह ग्रामस्थ व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ग्राम महसूल अधिकारी बाबुराव शिंदे यांना नालंदा ऑर्गनायझेशनकडून पुरस्कार



**बीड । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील होळ येथील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) बाबुराव काशिनाथ शिंदे यांना पुणे येथे नालंदा ऑर्गनायझेशनकडून 'राज्यस्तरीय आदर्श ग्राम महसूल अधिकारी पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्वस्तरातून अभिनंदन केले जात आहे. बाबुराव शिंदे मूळचे होळ येथील असून त्यांनी गेली अनेक वर्ष पुणे जिल्ह्यात महसूल विभागात ग्राम महसूल अधिकारी पदावर काम केले आहे. गेल्या काही वर्षांपासून ते केज तालुक्यात कुंबेफळ येथे कार्यरत आहेत. त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन नालंदा ऑर्गनायझेशनकडून पुणे येथील कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्वस्तरातून अभिनंदन केले जात आहे.

## सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक अरुण डोंगरे यांना मातृशोक; देवकाबाई डोंगरे यांचे निधन

**बीड । प्रतिनिधी**

शिरुर (कासार) तालुक्यातील तागडगाव येथील मुळ रहिवासी सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक अरुण डोंगरे यांच्या मातोश्री देवकाबाई अंकुशराव डोंगरे यांचे वृद्धपकाळाने दि.२९ रोजी पहाटे ४.१५ वाजता निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय १०५ वर्षे होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. देवकाबाई या जुन्या पिढीतील धार्मिक, कष्टाळू, प्रामाणिक होत्या. त्यांच्या पार्थिवावर तागडगाव येथील रामनगर येथील शेतात अंतसंस्कार करण्यात आले. यावेळी यावेळी विविध थरातील प्रतिष्ठित मान्यवर, नातेवाईक, पोलीस अधिकारी, कर्मचारी व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## जानकाबाई घाडगे यांचे निधन

**केज । प्रतिनिधी**



तालुक्यातील जवळबन जेष्ठ महिला जानकाबाई बाबुराव घाडगे यांचे शुक्रवार रोजी सायंकाळी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना ,नातवंडे असा मोठा परिवार आहे. अक्का म्हणून त्या सर्व परिचित होत्या. त्या महादेव घाडगे , जयराम घाडगे व शिक्षक मल्हारी घाडगे यांच्या मातोश्री होत. त्यांच्या पार्थिवावर शनिवार रोजी सकाळी नऊ वाजता अंत्यसंस्कार जवळबन येथे करण्यात आले.



*मातृभुमी प्रतिष्ठान बीड व बीड जिल्हा प्रविण प्रशिक्षक संघटनेच्या वतीने दिनांक २९ नोव्हेंबर २०२४ रोजी राजेंद्र मोराळे यांची प्रकल्प संचालक तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग जिल्हा परिषद बीड पदी नुकतीच निवड झाल्याबद्दल त्यांचा बीड जिल्हा प्रविण प्रशिक्षक संघटना व मातृभुमी प्रतिष्ठान बीड यांच्या वतीने सन्मानपत्र, शाल श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी बीड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप सर, मातृभुमी प्रतिष्ठान बीड व बीड जिल्हा प्रविण प्रशिक्षक संघटनेचे अध्यक्ष जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ संजय तांदळे, लक्ष्मण चाटे व ऊसतोड कामगार कृती समितीचे बाजीराव ढाकणे आदींची उपस्थिती होती.*

# शालेय साहित्य वाटप करून क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन

## वंचित बहुजन व स्त्रियांना शिक्षणाची दारे उघडणारे क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले होत: हनुमंत कांबळे

### महामानव अभिवादन ग्रुप तर्फे शालेय साहित्य वाटप

**बीड । प्रतिनिधी**

मानवामध्ये स्पृश्य, अस्पृश्य उच्च- नीचतेतून व अनिष्ट रुढी परंपरेमुळे हजारो वर्षा शिक्षणा पासून वंचित असलेल्या बहुजन समाज व स्त्रियांना शिक्षणाची दारे आपल्या कृतीतून मुलींची पहिली शाळा उघडून शिक्षणाची दारी उघडणारे क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले १९ व्या शतकातील थोर क्रांतिकारक व समाज सुधारक होऊन गेले असे प्रतिपादन सहाय्यक उपनिबंधक सहकार खाते हनुमंत कांबळे यांनी केले.



महामानव अभिवादन ग्रुप तर्फे आयोध्या नगर व रमाई नगर परिसरातील १४१ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून महात्मा ज्योतिबा फुलेंना विनम्र अभिवादन केले या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी सेवानिवृत्त केंद्रप्रमुख अवसरमोल ए.एल. तर प्रमुख पाहुणे म्हणून महामानवा अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम. भोले, सेवानिवृत्त जिल्हा प्रबंधक एलआयसी यु.एस. वाघमारे, प्रशांत वासनीक, एड. तेजस वडमारे लाभले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डी.जि . वानखेडे यांनी केले तर सूत्रसंचालन डी.एम. राऊत यांनी केले. ह्या प्रसंगी मंचावर कॅप्टन राजाभाऊ आठवले, श्याम वीर, आर.डी. यांची प्रमुख उपस्थिती होती. दुसरे प्रमुख पाहुणे प्रशांत वाचनिक यांनी विद्यार्थी व पालकांशी संवाद साधताना महात्मा ज्योतिबा फुले यांनी अविधेमुळे सर्व सर्वा रसा तळाला गेले कसे हे अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितले. शिक्षण म्हणजे सत्य जाणणे व विज्ञानवादी

▶▶ उर्वरित पान २ वर

# हिंदूंना मते देणारे मुस्लिम खरे सेक्युलर: भागवत तावरे

## राणे पुत्राने तोंड सांभाळून सत्ता भोगावी, टिपू सुलतान जयंतीत सलोखा कडाडला

**तलवाडा । प्रतिनिधी**

आलेम दिन सज्जाद नोमानी यांनी पुरोगामो विचारांचे उमेदवार निवडून द्या असे म्हणत जनतेला आवाहन केले मात्र भाजपने त्यांच्या वक्तव्याचा विपर्यास करत बटेंगे तो कटगे असा भीतीदायक प्रचार करत हिंदू मतांचे केंद्रीकरण साधले. मात्र सज्जाद नोमानी साहेबांनी बांद्रा मतदार संघात ब्राम्हण उमेदवार वरून सरदेसाई यांना मत देण्याचे आवाहन केले ज्यातून जिसान सिद्दीकी या मुस्लिम उमेदवाराचा पराभव झाला. बीड



सहित महाराष्ट्रात अनेक हिंदू उमेदवारांना मुस्लिमांनी भरभरून मते दिली यातून मुस्लिम धर्मांध नाही तर खरे सेक्युलर सिद्ध होतात. मात्र भाजपने मुस्लिम समाजाला बदनाम केले नितेश राने यांनी मौलाना मस्जिद भोंगे वरून अपशब्द वापरून भावना दु:खाऊ नयेत असे भागवत तावरे यांनी म्हटले ते तलवाडा येथील ह टिपू सुलतान जयंती मधील मुख्य वक्ते म्हणून बोलत होते यावेळी समता परिषदेचे अध्यक्ष बापुगाडेकर,हजरत टिपू

▶▶ उर्वरित पान २ वर

## राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील साक्षी घुले हिची राज्य उत्पादन शुल्क विभागामध्ये पोलीस कॉन्स्टेबल म्हणून निवड



**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील बीएस्सी प्रथम वर्ष वर्गातील विद्यार्थीनी कुमारी साक्षी शशिकांत घुले हिची राज्य उत्पादन शुल्क विभाग अंबाजोगाई येथे पोलीस कॉन्स्टेबल म्हणून निवड झाली आहे. त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या विद्यार्थिनीने प्राप्त केलेल्या यशाबद्दल प्राचार्यांनी कौतुक व अभिनंदन करून भावी वाटचालीसाठी सदिच्छा व्यक्त केल्या. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, डॉ. स्मिता बसोले, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर, प्रभारी कार्यालय अधीक्षक श्री. केशव भोंडवे, प्लेसमेंट सेलचे ऑफिसर डॉ. अनंथा गाडे, डॉ. विजयकुमार कुंभारे, प्रा. विनायक कापावार, प्रा. नागोराव वाघमारे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# कोट्यवधींची प्लॉट विक्री धारकाचा शासकीय कामांच्या फलकावर डल्ला

## विनापरवाना वृक्षतोड प्रकरणात वनविभागाचे दुर्लक्ष: डॉ.गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद व नगर परिषद कार्यालयामार्फत जिल्ह्यात होत असलेल्या कामांचे उद्घाटन व लोकार्पण फलक कामाच्या ठिकाणी लावणे बंधनकारक असते.या फलकावर काम कोणत्या विभागामार्फत करण्यात येत आहे, कामांसाठीचा निधी तसे काम कोणत्या कंत्राटदारांच्या कंपनी मार्फत करण्यात येत आहे तसेच काम सुरू करण्याचा व काम पूर्ण झाल्याचा दिनांक या फलकावर नमुद करण्यात आलेला




असतो. मात्र या फलकांवर सुद्धा डल्ला मारल्याचा प्रकार प्लॉट विक्री धारकाकडून करण्यात आला असुन अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावरील मांजरसुंभा ते पाटोदा दरम्यान लिंबागणेश येथील हॉटेल सांज गारवा शेजारी भालचंद्र नगर नावाने प्लॉट विक्री सुरू असून प्लॉट विकली धारकाने त्याठिकाणी लावण्यात आलेला फलक हा सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा परिषदेच्या सिमेंट नाला बंधा-यावरील असुन त्यावर कलर करून लावण्यात आला आहे.परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाचे नाव पुर्णपणे पुसले न गेल्याने नाव ठळकपणे दिसून येत आहे. प्लॉट विक्री करणाऱ्या मालकाने शासकीय फलकावर डल्ला मारावा हा विषय चर्चेला बनुन राहिला आहे.

तत्कालीन वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दि.१२ जुलै अर्थ संकल्प २०२४-२५ दरम्यान लक्ष्यवेधी प्रश्नाला उत्तर देताना महाराष्ट्र वृक्षतोड ( नियमन) अधिनियम १९६४मधील कलम ४ मध्ये दुरुस्ती करून विना परवाना वृक्षतोड प्रकरणात सुरूवातीला

▶▶ उर्वरित पान २ वर